Vol 7 Issue 2 Nov 2017

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2017

# महिला रोजगाराची सत्यता (विशेष संदर्भ – आदिवासी महिला)



प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे
राज्यशास्त्र विभाग, गंगामाई एज्यु. ट्रस्टचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, नगांव.

• **सारांश –**

भारतात महिला शिक्षणाचा विकास मोठया प्रमाणात झाला. दलित आदिवासी समाजाला सरकारने शिक्षणाची दालने मोकळी केल्याने मागील काही वर्षात मोठा शिक्षीत महिला वर्ग निर्माण झाला. शिक्षणातून महिलांमध्ये मुलभूत अधिकार व हक्काची जाणीव झाली आणि त्यातुन आर्थिक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने सहभाग मिळावा याबाबत महिलांमध्ये जाणीव निर्माण झाल्याने सरकारने देखील महिलांना देशाच्या विकास कार्यात सहभागी करून घेणे, आणि त्यांचा गुणवत्ता व श्रमशक्तीचा योग्य उपयोग करण्याचे धोरण विविध पंचवार्षिक धोरणांच्या माध्यमातुन आखले. आणि म्हणूनच आज देशाच्या विकासात महिलांचे योगदान नाकारता येत नाही.

• **प्रस्तावना –**

आज भारताची गणना विकसनशील देशात होतांना दिसून येते. त्यामुळे या देशाच्या प्रगतीत जेवढा सहभाग पुरूषांचा आहे तेवढाच सहभाग महिलांचा दिसून येतो. राजकिय व सामाजिक क्षेत्राबरोबर आर्थिक क्षेत्रातील सेवा, शेती , उद्योग, खाजगी व सरकारी इ. अनेक क्षेत्रात महिला आपल्या काम व गुणवत्तेच्या आधारावर योगदान देत असल्यामुळे आज देशाची गणना प्रगतशिल राष्ट्रात होउ लागली आहे. प्रस्तुत शोध निबंधात रोजगार क्षेत्रात महिलांचे योगदान किती आहे. तसेच दलित व आादिवासी समाजाचे अर्थिक क्षेत्रातील योगदान व महत्व मांडण्याचा प्रयत्न यांत केला आहे.

• **मुख्य शब्द –**

महिला रोजगार, सेवा क्षेत्र , केंद्र व राज्य सरकारे, प्रशासकिय पदे व विभाग , आदिवासी महिला , कामशक्ती, नियोजन व कार्यक्रम.

• **महत्व –**

महिला या कोणत्याही देशाच्या निम्या श्रमशक्ती व बौध्दिकशक्ती असतात. देशाच्या प्रगतीत व सेवा क्षेत्रात महिलांचे योगदान मोलाचे असल्यामुळे महिलांच्या गुणवत्तेचा , श्रम व बौध्दिक शक्तीचा उपयोग प्रत्येक शासनाला देशाच्या विकासासाठी करावा लागत असल्यामुळे महिलांचे रोजगारातील योगदानाला महत्व प्राप्त होते. म्हणून विकास कार्यात महिला श्रमशक्ती योगदानाला महत्वाचे स्थान आहे.

• **उद्देश –**

1) भारतातील महिलांचे व विशेष करून आदिवासी महिलांचे रोजगारातील प्रमाण अभ्यासणे.
2) महिला श्रमशक्ती व बौध्दिक शक्तीचा उपयोग सरकाने करण्याबाबत मार्गदर्शन करणे.
3) आदिवासी महिलांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान व समस्याची चर्चा करणे.
4) महिलांच्या श्रमव बौध्दिक शक्तीला प्रोत्साहन देउन त्यांना देशाच्या विकास कार्यात सहभागी करून घेणे.

• **गृहितक –**

1) केंद्र व राज्यांच्या सेवा क्षेत्रात महिलांचीश्रमशक्ती सहभाग व योगदान पुरूषांइतकेच महत्वाचे आहे.
2) रोजगार क्षेत्रात महिलांचा सहभाग कमी जरी असला तरी त्यांची रोजगार क्षेत्रातील भुमिका व कार्य याला महत्वाचे स्थान आहे.

• **वैज्ञानिक पध्दती –**

प्रस्तुत शोध निबंधासाठी विविध ग्रंथ , पुस्तके, वृत्तपत्रे, अहवाल यांचा उपयोग करण्यात आला असून विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

• **विश्लेषण –**

आदिवासी जमातीचे संपुर्ण आर्थिक जीवन जंगलावर अवलंबून असते. जंगलात उपलब्ध असणा–या कच्च्या साधनसामुग्रीतून ते आपले आर्थिक उदरनिर्वाहाचे जीवन जगत असतात. जंगलावर आधारित कुटिरउद्योग, ग्रामीण उद्योग, औषधी उद्योग इ. आर्थिक उत्पादनाच्या कमाईचे साधने असली तरी या आदिवासींना जंगल कंत्राटदारांकडून आजुबाजुच्या परीसरात मोठया प्रमाणात काय उपलब्ध होते. रस्ते बांधणी, दुरूस्ती, साखर

कारखान्यात कामगार किंवा उसतोडणी, द्राक्षतोडणी , बिडी उद्योग , डिंक, मध महुंच्या फुलांची दारू यातुन त्यांना असंख्य व्यवसाय उपलब्ध होतात. कारण असे म्हटले जाते कि समाज आर्थिक दृष्टया सक्षम जर असेल तर राजकिय सामाजिकरणाची प्रक्रीया जलद होते.

परंतु बहुतांशी आदिवासी स्त्री पुरूष शारिरिक श्रम, व अकुशल कामावर अवलंबुन राहूनच रोजगार मिळवित असतात. त्यामुळे एकतर शहरी भागात मजुरी व शेतावर मजुरी हे दोनच पर्याय त्यांना उपलब्ध असतात. रोजगारासाठी स्थलांतर करणे असे प्रकार देखील मोठया प्रमाणात आहेत.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या रोजगाराबाबत इंडियन इन्स्टियूट ऑफ दलित स्टडीज , नवी दिल्ली या संस्थेने 2010 मध्ये एक अहवाल प्रसिध्द केला त्यात म्हटले आहे कि श्शेतजमीन व भांडवली मालमत्तेची साधने कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने अनुसूचित जाती व जमातीतील लोकांना मोलमजूरी करण्याशिवाय उदरनिर्वाहाचा दुसरा पर्याय उपलब्ध होत नाही. त्यामुळे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यामध्ये मोलमजुरी करणा–या लोकांचे प्रमाण 61% आहे. शहरी भागात मोलमजुरी करणा–या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील लोकांचे प्रमाण 64% आहे. व इतर जातीजमातीमधील हे प्रमाण केवळ 7% आहे. वर्ष 2000 च्या नोंदीप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लोकांवरील बेरोजगारीचे प्रमाण 5.5% म्हणजे इतर जातीतील लोकांच्या प्रमाणापेक्षा दुप्पट होते.”[1]

स्त्रीयांच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम स्त्रीयांच्या विशेष करून आदिवासी स्त्रींयांच्या राजकिय सामाजिकरणावर मोठया प्रमाणात होत असतो.

केंद्र व राज्यशासनाचे आद्य कर्तव्य आहे कि , देशात जास्तीत जास्त रोजगार निर्माण करणे. खाजगी , सरकारी व सहकारी क्षेत्रात रोजगाराची संधी व साधने उपलब्ध करून देणे दोन वेळेचे पुरेसे अन्न व राहण्यासाठी निवारा प्राप्त होईल अशी व्यवस्था उपलब्ध देणे सरकारचे कर्तव्य बनते.

परंतु ज्या देशांत कामगारांचे शोषण होते त्या देशांत राजकिय सामाजिकरणाच्या प्रक्रीयेला जलद चालना प्राप्त होते व तेथे विविध कामगारांच्या राजकिय चळवळी जलद गतीने उभ्या राहतात. श्कामगार चळवळीचे अंतिम उदिष्ट अर्थातच त्या वर्गासाठी राजकिय सत्ता हस्तगत करणे हे आहे. साहजिकच हे करण्यासाठी कामगारांच्या आर्थिक लढयातून निर्माण झालेली अर्थिक संघटना त्याआधी काही विशिष्ट उंचीपर्यंत विकसित झाली असली पाहिजे तरीही त्या उलट कामगार चळवळीत कामगार वर्ग म्हणून सत्ताधारी वर्गाला विरोध करतो आणि बाहेरून दबाव आणून काबूत आणण्याचा प्रयत्न करतो अशी प्रत्येक चळवळ ही राजकिय चळवळ असते.श्2 तसेच देशातील विविध विभाग संस्था यांत कार्य करणारे कर्मचारी यांची निर्मिती हि सामाजिक विकासासाठीच होत असते. भौतिकवादयांच्या मते श्संस्थांचा विकास व उगम ऐतिहासिक दृष्टीकोनातून व सामाजिक गरजेतून होत असतोश्3 आाणि म्हणून अशा विविध संस्था, विभागात ज्याप्रमाणे पुरूषांची भुमिका महत्वाची ठरते त्याचप्रमाणे स्त्रियांची देखील भुमिका महत्वाची असते कारण देशाची अर्धी श्रमशक्ती स्त्री असते. आाणि म्हणूनच ख–या अर्थाने महिलांच्या राजकिय सामाजिकरणाचा अभ्यास करायचा असेल तर रोजगार महिलांचा सहभाग अभ्यासणे आवश्यक असते कारण ज्या देशात रोजगाराच्या समस्या , महिलांचा रोजगारीचा प्रश्न व त्यांच्या श्रमशक्तीचे नियोजन योग्य प्रकारे होत नसेल तर अशा महिला या आर्थिक आधिकाराबाबत जागरूक असतात.

### • रोजगारात महिलांचा सहभाग –

देशाच्या विकासाची जबाबदारी हि संपूर्णपणे कर्मचारी प्रशासनावर अवलंबुन असते प्रत्येक कर्मचा–याला काम करतांना आमदार , खासदार, मंत्री , स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रशासकिय आधिकारी व पुढारी यांचा संबंध प्रत्येक महिला आधिका–याशी येत असतो. देशात कामाची सचोटी , प्रामाणिकपणा , स्वच्छ व पारदर्शक कारभार या गुणांवर देशातील महिला आधिका–यांनी मोठे नांव कमविले.

महिलांचा रोजगारात सहभाग अभ्यासता असता असे दिसून येते कि 1971 मध्ये 14.22%, 1981 मध्ये 19.67% , 1991 मध्ये 22. 27% , 2001 मध्ये 25.7% महिलांचा सहभाग देशाच्या रोजगार व श्रमशक्तीत होता. यांत सार्वजनिक क्षेत्रात 1980 मध्ये 9.7% , 1991 मध्ये 12.3%, 2001 मध्ये 15.2% तर श्संगठीत क्षेत्रात 1971 मध्ये 11% , 1981 मध्ये 12.2% , 1991 मध्ये 14.1% तर 2001 मध्ये 17.3% सहभाग महिलांचा होता.”[4]

### उद्योगाच्या आधारे कामगारांचे वर्गीकरण – (1999 –2000 ते 2011 –2012)

| वर्ष | एकुण | | ग्रामीण | | शहरी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| १९९३-१९९४ | ५४.४ | २८.३ | ५५.३ | ३२.८ | ५२.१ | १५.५ |
| १९९९-२००० | ५२.७ | २५.४ | ५३.१ | २९.९ | ५१.८ | १३.९ |
| २००४-२००५ | ५४.७ | २८.२ | ५४.६ | ३२.७ | ५४.९ | १६.६ |
| २००७-२००८ | ५५ | २४.६ | ५४.८ | २८.९ | ५५.४ | १३.८ |
| २००९-२०१० | ५४.६ | २२.५ | ५४.७ | २६.१ | ५४.३ | १३.८ |
| २०११-२०१२ | ५४.४ | २१.७ | ५४.३ | २४.८ | ५४.६ | १४.७ |

संदर्भ – महिला रोजगार आशेची अभिलाषा – नीता एन यांच्या शोध निबंधातातून
(योजना – अंक 9 , एप्रिल 2017 , पान नं. 28)

| वर्ष | १९९९-२००० | | २००४-२००५ | | २०११-२०१२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया | पुरूष | स्त्रिया |
| कृषी | ५२.७ | ७५.४ | ४८.६ | ७२.८ | ४२.५ | ६२ |
| खाणकाम आणि उत्खनन | ०.७ | ०.३ | ०.७ | ०.३ | ०.६ | ०.३ |
| निर्मिती उद्योग | ११.५ | ९.५ | १२.४ | ११.३ | १२.६ | १३.४ |
| वीज, वायू आणि पाणीपुरवठा | ०.४ | ० | ०.४ | ० | ०.४ | ०.१ |
| बांधकाम | ५.८ | १.६ | ७.६ | १.८ | १२.४ | ६ |
| सेवा | २८.८ | १३.२ | ३०.२ | १३.७ | ३१.५ | १८.३ |
| एकूण | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

योजना – केंद्रसरकार माहिती व प्रसारण मंत्रालय , अंक 9 , एप्रिल 2017 , पान नं. 29
(महिला रोजगार – आशेची अभिलाषा – नीता एन. यांच्या शोध निबंधातून)

### *भारतातील संघटित क्षेत्रातील महिलांच्या रोजगाराचे प्रमाण –*

| अ.नं. | क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक क्षेत्र | १६.५% |
| २ | खाजगी क्षेत्र | २४.५% |

वृत्त संकलन – सकाळ 23 फेब्रुवारी 2013

"भारतीय प्रशासकिय सेवेचा विचार केल्यास , 1992 मध्ये एकूण भरलेली पदे 4928 होती त्यात पुरूष 4498 तर स्त्रिया या 430 होत्या. त्याची टक्केवारी 8.7 % होती. तर 1997 मध्ये 4991 पदे भरली गेली त्यात पुरूषांची संख्या 4479 तर स्त्रियांची संख्या 512 होती त्याची टक्केवारी 10.3% होती"[5]

"भारतीय परराष्ट्र सेवा (IFS) मध्ये 1985 मध्ये 535 उमेदवारांची भरती झाली त्यात 485 पुरूष तर 50 स्त्रिया होत्या त्यांचे 9.3 % होते तर 1998 मध्ये 587 उमेदवार निवडले गेले त्यात पुरूषांची संख्या 520 तर स्त्रियांची संख्या67 म्हणजे 11.7 % होते."[6] तर 2005 –2009 मध्ये भारतीय परराष्ट्रीय सेवेत 29 महिलांची नेमणूक झाली.

"भारतीय पोलीस सेवेमध्ये 1985 मध्ये 2343 पदे भरली त्यात पुरूष 2325 तर स्त्रीया या 0.8 % होत्या तर 1999 मध्ये 3115 पदे भरली गेली त्यात पुरूष 3007 तर स्त्रीया या 108 होत्या म्हणजे त्यांची टक्केवारी 3.5 % होती."[7]

आज जगामध्ये 2011 मधील जनगणनेनुसार भारतात 487 मिलियन कामगार आहेत जे वननिर्मितीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत.

सरकारने शिक्षणाचा प्रसार तळागाळापर्यंत केला आहे. आदिवासी समाज विशेष करून आदिवासी महिलांचे शिक्षणाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे. सरकारने देखील शिक्षण व नोकरी क्षेत्रात महिलांना आरक्षण प्रदान करून मोठया प्रमाणात आदिवासी महिलांना सहभाग सेवा क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढत असून त्यांच्या कार्यशक्तीचा पुर्ण उपयोग करून घेण्याचे धोरण शासनाचे आहे.

स्वातंत्र्यापासूनच महिलांनी भारताच्या श्रमशक्ती व कार्यशक्ती सहभाग क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावली आहे. महिलांच्या कार्यशक्ती सहभागाचा अभ्यास केल्यास "1981मध्ये 19.67%,1991मध्ये 22.27% तर 2001 मध्ये 25.63 %"[8] महिलांचा सहभाग होता. म्हणजेच 1981 पासून महिलांचा देशाच्या विकासासाठी कार्यशक्ती सहभाग मंदगतीने वाढत आहे.

आज भारताचा एकूण लोकसंख्येचा प्रमाणात 52409823 पुरूष आहेत तर 51871211 आदिवासी महिला आहेत. या सर्व आदिवासी महिलांचा भारताच्या आर्थिक क्षेत्रात प्रत्यक्ष– अप्रत्यक्षपणे माठया प्रमाणात आहे. आदिवासींची अर्थव्यवस्था हि जास्तीत जास्त जंगलावर अवलंबून व ग्रामीण कुटीर उद्योगांवर अवलंबून असल्याने आदिवासी महिलांचा सहभाग यांत मोठया प्रमाणात आहे. त्याचबरोबर भारतात 7% आरक्षण केंद्र शासनाच्या सेवेत आदिवासी समाजाला सामावून घेण्यासाठी सरकारने दिलेले असल्यामुळे मोठया प्रमाणात आदिवासी महिलांचा सहभाग सेवा क्षेत्रात वाढला आहे.

### • *धुळे जिल्हयाच्या परिपेक्षातून –*

धुळे जिल्हयाची अर्थव्यवस्था हि शेतीवर अवलंबून आहे. या जिल्हयांत शासनाचे निर्माण केलेले औद्यिगिक क्षेत्र आहे. परंतु या औद्यिगिक क्षेत्राचा जलद विकास व औद्यिगिक क्षमता अत्यंतमंद आहे. वर्ष 2013 च्या नोंदणी झालेल्या व राष्ट्रीय उद्योग सांकेतांक असलेल्या उद्योगात एकूण 10581 कामगार कार्यरत असून त्यात 9953 पुरूष तर स्त्री 628 आहेत. तर 2012 च्या आकडेवारीनुसार एकूण कामगारांची संख्या 9484 असून त्यात पुरूषांची संख्या 8891 तर स्त्रियांची संख्या 593 होती.

जिल्हयांत दारिद्रय रेषेखाली जगणारी बहुतांशी कुटुंबे हि आदिवासी जमातीतुन आहेत. त्यात मजुर महिलांचे प्रमाण मोठया प्रमाणात आहेत. जीवन जगतांना प्रथम प्राधान्या आपल्या रोजी रोटीला देणे हे प्रथम कर्तव्य या आदिवासी महिला समजतात. गरीबी व पोटाची खळगी भरणे हा पहिला उद्देश असल्यामुळे बहुतांशी आदिवासी महिला या देशाचे शासन व राजकारण समजून घेण्याची उत्सुकता दाखल नाही त्यामुळे राजकिय सामाजिकरणाच्या प्रक्रीयेपासून या महिला दूर होतात.

• *आज आदिवासी महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते त्यांत*

1) आदिवासी ंची पदे भरण्यास टाळाटाळ
2) आदिवासी महिलांची अनेक पदे रिक्त असून त्यासाठी लायक उमेदवार प्राप्त न होणे.
3) आदिवासी स्त्री हि चाकोरीबध्द जीवन जगणारी असते ती शहरी संस्कृती व आधुनिक परिवर्तने स्विकारण्यास सहजासहजी लवकर तयार होत नाही. चूल व मूल यांतच राहून जीवन जगण्याचा आनंद त्यांना वाटतो त्यामुळे त्यांना देशाच्या विविध सेवा क्षेत्रात कार्य करण्याचा रस वाटत नाही.
4) शिक्षणाचे प्रमाण जरी आदिवासी समाजामध्ये वाढत असले तरी फक्त उच्च शिक्षणापर्यंत फक्त 3ः आदिवासी पोहचू शकतात. त्यामुळे पदासाठी आवश्यक असलेली गुणवत्ता प्राप्त होत नाही. व अनेक पदे रिक्त राहतात.
5) सेवा क्षेत्रात मोठया प्रमाणात आदिवासी महिला अन्याय व अत्याचार होत असतो.
6) न्याय मिळवण्यासाठी लागणारा कोर्ट कचेरीचा खर्च करण्याची ऐपत आदिवासी महिलांमध्ये नसते.
7) प्रशासकिय अधिका–यांकडेन पाहिजे तसे सहकार्य मिळत नाही.

अशी अनेक कारणे आहेत जी आदिवासी महिलांना सामाजिक व अर्थिक स्थैर्य प्राप्त करून घेण्यासाठी अडथळे निर्माण करतात. आणि त्यातून या महिलांना माठया समस्यांना तोंड द्यावे लागते.

महिलांच्या मानवाधिकारात महिलांचे आर्थिक सबलीकरण करणे हा महत्वाचा उद्देश आहे. भारतामध्ये उत्तर वैदिक काळापासून स्त्रीयांना कमी दर्जा दिलेला आहे. अर्थिक बाबतीत विचार केला तर स्त्रीयांचा अर्थिक स्वावलंबन याचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत कमीच आहे. विशेष करून आदिवासी महिलांचा प्रश्न अत्यंत बिकट आहे. आज सरकारने अनेक कायद्याव्दारे विविध क्षेत्रात सवलती, आरक्षण देउन महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा मोठया प्रमाणात प्रयत्न केला. कलम 14 नुसार आर्थिक क्षेत्रात समान संधी , कलम 15 नुसार लिंगभेद करण्यास प्रतिबंध, कलम 39 नुसार समान कायद्याखाली समान वेतन, कलम 42 नुसार प्रसुती विषयक योजना इ. अनेक प्रकारची सुरक्षा प्रदान करून त्यांना आर्थिक सुरक्षा देण्याचा प्रयत्न केला . आर्थिक सबलीकरणाचा उददेश डोळयासमोर ठेवून महिलांसाठी रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम 1987 , महिला समृध्दी योजना 1993 , राष्ट्रीय महिलस कोश , इंदिरा महिला योजना 1995 , महिला व बालविकास कार्यक्रम 1997 , बालिका समृध्दी योजना, एकात्मिक स्वयंसहायता बचतगट या सारखे कार्यक्रम राबवून महिलांचे आर्थिक सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला याचा परिणाम असा दिसून आला कि आर्थिक सेवा क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला त्याबरोबर महिला या आर्थिक बाबतीत सक्षम होउ लागल्या. परंतु आज देखील आदिवासी महिलांच्या अर्थव्यव्यवस्थेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आजदेखील बहुतांशी आदिवासी महिलांचे उत्पादनाचे स्त्रोत हे जंगल व त्यावर आधारित लघु व कुटिर , शेती उद्योग आहे. आजही त्यांचे जीवन संपूर्णपणे परंपरागत व्यवसाय उद्योग यांवर अवलंबून असल्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेची सुरक्षा करणे शासनाचे कर्तव्य बनते.

• *उपाय –*

1) जास्तीत जास्त महिलांना सेवा क्षेत्रात सामावून घेण्यासाठी महिला रोजगाराची निर्मिती करणे.
2) महिला श्रमशक्तीचा पूर्ण उपयोग करण्यासाठी सक्षम महिला धोरण व कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.
3) महिला आरक्षण धोरण प्राधान्य देणे.
4) महिला रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.
5) आदिवासी महिलांना सेवा क्षेत्रात विशेष प्राधान्य देणे.

• *निष्कर्ष –*

आज रोजगार व सेवा क्षेत्रात महिलांचा सहभाग थोडाफार कमी जरी दिसत असला तरी महिलांचे सेवा व रोजगार क्षेत्रातील योगदान नाकारता येत नाही. विशेष करून आदिवासी महिलांचा सहभाग आरक्षण धोरणामुळे मोठया प्रमाणात वाढत असल्याने महिलांचे सेवा व रोजगार क्षेत्रातील स्थान सन्मानाचे आहे हे नाकारून चालणार नाही.

*संदर्भ –*

1. थोरात सुखदेव, नेगी प्रशांत आर्यमा – खाजगी क्षेत्रातील आरक्षण चर्चेतील प्रश्न, गरज आणि अपेक्षा (अनुवाद – नंदकुमार पुरोहित ) सुगावा प्रकाशन, पुणे , आवृत्ती – प्रथम, 201 , पान नं. 20
2.मार्क्स व फ्रेडरिक एंगल्स यांचा विडक पत्रव्यवहार – संकलन कॉ. लेलिन ( मराठी अनुवाद – शांता रानडे ) आवृत्ती – प्रथम , प्रागतिक प्रकाशन, पुणे, 1984 , पान नं. 235
3. घांगरे एस.बी, गजेंद्रगड व्हि. एन. – समाजशास्त्रीय विचारांचे अंतरंग , आवृत्ती – प्रथम साधना बुक स्टॉल , कोल्हापूर, 1980 , पान नं. 36
4. सिंह उमेश प्रताप , गर्ग राजेशकुमार – महिला सशक्तीकरण विभिन्न आयाय , अध्ययन पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, दिल्ली, 2012 , पान नं. 143
5. गठाळ एस.एस. – भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन कैलास पब्लिकेशन्स , औरंगाबाद , आवृत्ती – प्रथम, 2013 , पान नं. 429
6.उपरोक्त पान नं. 430
7. उपरोक्त पान नं. 429
8. वार्षिक अहवाल 2012–2013 , कामगार व रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com